**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. २९३७ दि.०८/०९/२०१९**

## प्रेसनोट दिनांक - ०८/०९/२०१९

### युटयुबवर ज्योतिष शास्त्राविषयी खोटी जाहीरात टाकुन महिलेची फसवणुक करणाऱ्या उच्च शिक्षित राजस्थानी तरुणास सायबर पोलीस स्टेशन कडुन अटक

कोंढवा, पुणे येथे राहणाऱ्या मध्यम वयातील महिलेने युटयुब या सोशल साईडवर ज्योतिष शास्त्राविषयी जाहीरात पाहीली. घरात सतत भांडणे व क्लेश चालु असल्याने सदर महिलेने घरातील भांडणे व क्लेश दुर करण्यासाठी युटयुब या सोशल साईडवर ज्योतिष शास्त्रा जाहिरातीमधील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता समोरील व्यक्तीने मी मोहम्मद अली ज्योतिषी बोलत असे सांगितले. त्यावर पिडीत महिलेने तिच्या कौटुंबिक अडचणीबाबत संबधित ज्योतिषीस सांगितले असता समोरील व्यक्तीस " तुम पर काला जादु है" असे सांगुन भिती घातली. उपाय म्हणुन महापुजा, होमहवन, व बळी असे वेगवेगळी कारणे सांगुन त्यासाठी वेळोवेळी पैसे भरण्यास भाग पाडुन पिडीत महिलेची एकुण १,०६,०००/- रुपयांची फसवणुक केली. समोरील ज्योतिषी वांरवांर पैशांची मागणी करु लागल्याने व पिडीत महिलेच्या जिवनात कोणत्याही प्रकारचा फायदा न झाल्याने तिची फसवणुक झाली असल्याचे तिच्या लक्षात आले. त्यामुळे तिने सायबर पोलीस स्टेशन गु.र.न. १४/२०१९ भादवि सह ४१९, ४२० अन्वये तक्रार दिली आहे.

सदर गुन्हयाचा तपास सायबर पोलीस स्टेशन पुणे येथील रविंद्र गवारी, पोलीस उप-निरीक्षक यांच्याद्वारे करण्यात आला तपासमध्ये ईवॉलेट व मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील आरोपी हा राजस्थानमध्ये बसुन सदरची फसवणुक करत असल्याबाबत निष्पन्न झाल्याने सायबर पोलीस स्टेशन कडील एक पथक तात्काळ राजस्थान येथे रवाना करण्यात आले. सदर पथकाने अधिक तपास करुन आरोपी नामे शुभम सेतीया वय- २१ वर्ष रा. घर नं १४८/३, गल्ली नं ३, भोप कॉलनी , जिल्हा: श्रीगंगानगर राज्य: राजस्थान यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास करता आरोपीने भारतमधील आणखी ३० ते ४० नागरिकांची अश्याप्रकारे फसवणुक केल्याचे प्रथमदर्शी निष्पन्न होत आहे. नमुद आरोपीस अटक करुन त्याच्याकडुन गुन्हयात वापरलेले २ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच गुन्हयातील १,०६,०००/- रुपये रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपीची पोलीस कोठडी घेवुन त्याच्याकडे अधिक तपास करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी श्री. संभाजी कदम, पोलीस उप-आयुक्त, श्री. शिवाजी पवार, सहा. पोलीस आयुक्त, श्री. जयराम पायगुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली रविंद्र गवारी, पोलीस उप-निरीक्षक, कर्मचारी अस्लम अत्तार, शिरीष गावडे, हर्षल दुसाने, शुभांगी मालुसरे यांनी केली.

सायबर पोलीस स्टेशन यांच्याकडुन अवाहन करण्यात येते की, ज्योतिषी आहे असे सांगुन एस.बी.आय. बॅंक अकाऊंट नं. २०२२६७५७३५२, पंजाब नॅशनल बॅंक अकाऊन्ट नं. ३६०८००१५०००३८४८ व मोबाईल नंबर ९७८४८३९४३९, ८९५५५५५५७७ या व्दारे कोणाची फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर पोलीस स्टेशन , पुणे शहर येथे संपर्क साधावा.